# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७.
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल : dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र. : CA/2689

दिनांक : 8-10-11

तात्काळ /अत्यंत महत्वाचे
प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था

विषय : सन २००१ पुर्वी विनाअनुदान तत्वावर आलेल्या महाविद्यालयांची माहिती सादर करण्याबाबत.

संदर्भ:क्रंससं/उशि/नवीन/अभ्यासक्रम/पीआर/२०११—१२/२४०५

महोदय,

वरील विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या पत्रातील माहिती शासनास अतित्वरेने सादर करावयाची असल्याने, पत्रात नमुद केलेली माहिती तातडीने मा. उपकुलसचिव शैक्षणिक विभाग पुणे विद्यापीठ पुणे यांचेकडे व शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११००१ यांचेकडे पाठविण्यात यावी ही विनंती.

कळावे,

सोबत : शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग पुणे —१ यांचे पत्र

आपला विश्वासू
8/10/11
उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

महाराष्ट्र शासन
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ डॉ आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-

फोन न. ०२० २६१२७८३३/२६०५१६३२ E_mail ID- jdhepune@gmail.com फॅक्स नं. २६१२७८३३

क्र. ससं/उशि/नवीन/अभ्यासक्रम/पीआर/२०११-१२/2405 दि. ०५.०९.११

07 OCT 2011

**आजच/अत्यंत महत्वाचे**

प्रति,

मा. कुलसचिव,
पुणे विदयापीठ,
पुणे ४११ ००७.

विषय - सन २००१ पूर्वी विनाअनुदान तत्वावर आलेल्या-
महाविदयालयांची माहिती सादर करण्याबाबत..

वरील विषया संबंधी आपणांस कळविण्यात येते की, खालील मुदयांवरील माहिती शासनास अतित्वरेने सादर करावयाची असल्याने संबंधीत माहिती आजच या कार्यालयास पाठविण्यात यावी. संबंधीत माहिती अतिमहत्वाची असल्यामुळे या कार्यालयातील श्री. मयुरेश जोशी यांना समक्ष पाठविण्यात येत आहे तरी याबाबतचे गांभिर्य लक्षात घेवून संबंधीत माहिती तात्काळ या कार्यालयास पाठवावी.

१. सन २००१ पूर्वी विनाअनुदान तत्वावर ज्या महाविदयालयांना /विदयाशाखांना मान्यता देण्यात आली होती त्यापैकी जे महाविदयालय/विदयाशाखा अदयापही सुरू झालेले नाहीत असे पुणे विदयापीठ महाविदयालय/विदयाशाखा किती आहेत.

२. सन २००१ पूर्वी विनाअनुदान तत्वावर ज्या महाविदयालयांना /विदयाशाखांना मान्यता देण्यात आली होती त्यापैकी काही महाविदयालय/विदयाशाखा सुरु होउुन कालांतराने काही कारणास्तव बंद पडले अशी महाविदयालये पुणे विदयापीठामध्ये किती आहेत त्याची संख्या देण्यात यावी.

३. सन २००१ पूर्वी विनाअनुदान तत्वावर ज्या महाविदयालयांना/
विदयाशाखांना मान्यता देण्यात आली होती त्यापैकी काही महाविदयालय/विदयाशाखा सुरु होउुन कालांतराने काही कारणास्तव बंद पडले व शासनाची नूतनीकरणाची परवानगी न घेता काही वर्षानंतर पुन्हा सुरु करण्यात आले अश्या महाविदयालयांची /विदयाशाखेची माहिती.

वरील माहिती आजच संबंधीतांजवळ देण्यात यावी म्हणजे सदर माहिती आजच शासनास सादर करण्यास सुलभ होईल

**(डॉ. न.मा. कडू)**
**सहसंचालक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे-१**